# दीपगृह

गिरिजा कीर

रिया पब्लिकेशन्स्

दीपगृह : गिरिजा कीर

© गिरिजा कीर
५, झपुर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
संपर्क : २६५९०८८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
मिरर प्रिटिंग प्रेस, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ३२०/-

# अनुक्रम

## ज्ञानसिद्धी

प्रा. डॉ. य. दि. फडके/७
श्री. वामनराव चोरघडे/५८
श्री. आनंद साधले/७४
लीलावती भागवत/१००
शांतादेवी तडवी/११३
प्रा. रं. रा. देशपांडे/१२५
श्री. वि. आ. बुवा/१४३

## कलासिद्धी

स्मिता पाटील/१५१
जयश्री गडकर/१६५
सुमती गुप्ते/१७४
शुभा खोटे/१८४
लीला चिटणीस/१९६
कुमुद सचिन शंकर/२१२
चंद्रकांत केशव/२२३
रणजित बुधकर/२३२

## ध्येयसिद्धी

पद्मभूषण ताराबाई मोडक/२४९
प्राचार्य शिवाजीराव भोसले/२६२
शशिकला मरबळ्ळी/२७५
नंदिनी बालसेकर/२८५
मथुराबाई केतकर-रामानुजम/२९५
गीता दांडेकर/३०४
सुनील गावसकर/३२१

✦✦

# ज्ञानसिद्धी

# ज्ञानतपस्वी प्रा. डॉ. य. दि. फडके

## एक शोध

**माझ्या** स्वयंपाकघरासमोर डॉक्टर य.दि. फडक्यांच्या खोल्या आहेत. खिडकीशी उभं राहिलं की नजर सरळ समोर जाते. पुस्तकं, वह्या, पेन, कागद. पुस्तकांखेरीज या कुटुंबाचा विचारच करता येत नाही. 'यदि' हाच एक प्रचंड अभ्यास आहे. एक जाणून घ्यावासा वाटणारा, पण कठीण असा ग्रंथ आहे. तशी तर गेली कितीतरी वर्षं मी त्यांना पाहतेय, ऐकतेय.

एकदा इंदू साक्रीकर कथास्पर्धेचे परीक्षक म्हणून मी त्यांचं भाषण ऐकलं होतं. सडेतोड, थोडंसं फटकळ वाटावं असंच, पण विचार करायला लावणारं. त्यांनी व्यक्त केलेले विचार बक्षीस मिळवलेल्या लेखिकांनाही कठोर वाटले. मी एक लेखिका म्हणून ते सगळं ऐकून घेतलं.

तर असे हे य. दि. फडके- प्रत्येक गोष्टीचा कस लावणारे. कुठे हीन दिसलं तर कुणाचाही मुलाहिजा न बाळगता फेकून देणारे. कळत नकळत माझ्या मनात एक थोडीशी भीती निर्माण झाली. आपल्या लेखनाला या माणसाची पावती मिळाली तर ते चोख मानायला अगदी बिनदिक्कत हरकत नाही.

साहित्य सहवासात फडक्यांचा परिचय असा झालाच नाही. जे एक-दोनदा समोरासमोर आलो ते फारसं प्रसन्न बोलायला नव्हेच; पण या माणसाचा राग आला नाही. त्यांचं बोलणं गुरुवर्य न. र. फाटकांच्या जातीतलं वाटलं. त्यामुळं ते बोलणं रागाचं न मानता मी त्या शद्बांमागचा अर्थ शोधू लागले. फडक्यांनी आमच्या समोरची जागा घेतली आणि गॅसवरची भांडी उतरवता, उतरवता फोडण्या घालता, घालता मी समोरच्या खोल्या न्याहाळायला लागले. त्यांचं आणि सौ. वासंतीबाईंचं बैठक मारून एक सतत वाचणं आणि लिहिणं नजरेपुढं यायचं. कधी ही मंडळी टेबलाशी बशा घेऊन बसली की, गमतीनं मनात विचार यायचा, फडक्यांच्या समोरच्या एका बशीत दोन तुकडे समीक्षा असेल आणि एक आख्खा तुकडा संशोधनाचा असेल. फडके तोंडी लावायलाही शद्बच घेत असतील. अशा या वाचण्यासाठी जगणाऱ्या आणि जगण्यासाठी वाचणाऱ्या माणसाविषयी माझ्या मनात आदरयुक्त कुतूहल निर्माण झालं.

तसं फडक्यांचं लेखन अधून-मधून वाचलं होतं. 'मनुष्य विद्वान आहे'- इतपतच नोंद झाली होती. पण त्यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासावर लिहिलेल्या प्रबंधासंबंधीचा लेख वाचनात आला. त्या प्रबंधासाठी घेतलेल्या शंभरएक लोकांच्या मुलाखती, वाचलेले संदर्भ ग्रंथ, काढलेल्या नोट्स, या एकूण उद्योगावरचा लेख वाचनात आला आणि मन स्तिमित झालं. केवढी प्रचंड बौद्धिक उलाढाल! आपल्याला य. दि. फडके नावाचा हा माणूस समजून घ्यायलाच हवा.

त्यांचं सुरुवातीच्या काळचं लेखन, त्यात होत गेलेले बदल, त्यांनी केलेल्या समीक्षा आणि आज हाती घेतलेलं संशोधनाचं कार्य या सगळ्यांविषयीच माझ्या मनात विलक्षण उत्सुकता जागली होती. हे समजून घेऊन शब्दांत मांडता आलं पाहिजे असं वाटू लागलं.

हा फटकळ माणूस मुलाखत देईल? दिली तरी नीट बोलेल? जे काही बोलणं होईल त्यातलं आपल्याला कितपत उमजेल? उमजलेलं कितपत नेटक्या स्वरूपात मांडता येईल? भले की मी खूप कसोशीनं लिहिलं आणि त्यांनी एका शद्बात नापसंतीचा शिक्का मारून ते निकालात काढलं, तर?

या अनेक शंका मनात असतानाच औरंगाबादला कथाकथनाला गेले. तिथं परळकर दांपत्य भेटलं. त्यांच्या घरी जेवत असताना विषय निघाला - 'य. दि. फडके' आणि काय विचारता, ती दोघं नवराबायको फडके या माणसाविषयी इतक्या



ओतप्रोत जिव्हाळ्यानं बोलली की, माझ्या डोळ्यांपुढं एक वेगळंच चित्र उभं राहिलं. मी हळूच म्हटलं, ''त्यांची मुलाखत घ्यावी अशी माझी इच्छा आहे.''

प्रा. परळकर चटकन् म्हणाले, ''खरंच लिहा तुम्ही, गिरिजाताई त्यांच्यावर! ते इतकं चांगलं बोलतील! मुंबईच्या लोकांच्या मापानं तुम्ही त्यांना मोजू नका. ते सोलापूरकर आहेत. फार सरळ, स्वच्छ मनाचा माणूस.''

परळकरांच्या शद्बांची ऊब घेऊनच मी एक दिवस ''मुलाखत द्याल का?'' अशी फडक्यांना विचारणा केली. त्यांनी चटकन् होकार दिला. चला, टॉस तर मी जिंकला होता. पण पुढची खेळीच महत्त्वाची होती. मैदान चांगलं तयार करून घेतलं होतं. बॅटिंग करायची तयारी होती, पण समोरचा भिडू असा कसलेला की हाताला कापरं भरावं. ही मुलाखत मुळी नेहमीसारखी नव्हतीच. आम्ही संपूर्ण फडके-वाङ्मय वाचल्याशिवाय त्यांच्या समोर बसणं हे पाप. प्रथम त्यांच्या घरी जाऊन पुस्तकांचे भारे घेऊन आले. 'शोध बाळगोपाळांचा', 'व्यक्ती आणि विचार', 'शोध सावरकरांचा', काही मासिकं, कात्रणं, फाईल्स, संयुक्त महाराष्ट्रावरच्या प्रबंधाचा ग्रंथ, जी जी सामग्री मिळाली ती एकेक करून वाचून काढली. त्यांना डॉक्टरेट मिळवून देणारा सन्माननीय प्रबंध मात्र सतत बाजूला राहात होता. ते बाळसेदार पुस्तक दोन-तीन वेळा हाताळलं. पण वाचनाला गती येईना. वाचलेलं नेमकं ध्यानात येईना. सगळ्या आयुष्यभराची झोप याच वेळेला का यावी याचा उलगडा होईना. (फडक्यांची तरी कमाल आहे. डॉक्टरेटसाठी एवढं अवघड लिहिण्याची काय गरज होती?) शेवटी एकदा धीर करून त्यांच्या जिन्याच्या पायऱ्या चढले. 'तुमचा थीसीस मी पूर्ण वाचू शकत नाही आणि वाचलेलंही नीट कळलं नाही.' हे सांगणं महाकठीण. घराचं दार उघडेपर्यंत माझं ब्लडप्रेशर बरंच वाढलं असावं. नापास झालेल्या विद्यार्थ्यासारखा चेहरा करून मी विचारलं, ''सर आहेत?''

(त्यांची पुस्तकं वाचत असतानाच मी त्यांना 'सर' की देऊन टाकली.)

''ते बाहेरगावी गेले आहेत.''सौ वासंतीताई म्हणाल्या. मला एकदम बरं वाटलं. आणि एका दमात मी वासंतीताईंना सगळं सांगून मोकळी झाले. त्या हसल्या. म्हणाल्या, ''ठीक आहे. तो तुमचा विषय नव्हे. मी सांगेन त्यांना.''

त्यानंतर तारीख ठरवून लागोपाठ बैठकीचे दिवस आणि वेळा ठरवल्या.

वही-पेन सरसावून कोचावर किंचित् अवघडून मी बसले. समोर खुर्ची घेऊन यदि बसले होते. पहिल्या दिवशीच्या बैठकीतच त्यांच्या बोलण्याची

पद्धती, उत्तर देण्याची तऱ्हा, शद्बांची आणि विचारांची मांडणी या सगळ्यांचा मला अंदाज येणार होता. हाती घेतलेलं काम कितपत अवघड किंवा सोपं आहे हे आपोआप कळणार होतं.

''संशोधनाच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वानं एक विशिष्ट स्थान मिळवलेला तुमच्यासारखा माणूस घडला कसा हे जाणून घेण्याची अनेकांना उत्सुकता असते. आपण जे काही असतो, त्यात लहानपणाचे संस्कार, आजूबाजूचं वातावरण, घरीच परिस्थिती या अनेक गोष्टी कारणीभूत असतात. या दृष्टीनं आपण आपल्या बालपणाविषयी काही सांगावं असं मला वाटतं. विस्तारानं जे जसं आठवेल तसं सांगा. तुम्हाला समजून घेणं हा महत्त्वाचा भाग. प्रश्न-उत्तरं असं याचं स्वरूप नाही. तुमच्याशी होणाऱ्या गप्पांतून ही मुलाखत आकार घेणार आहे.''

''सांगतो. आम्ही चौघे भाऊ, बहीण, आजी-''

''आजी म्हणजे? वडिलांची आई की आईची आई?''

''वडिलांची आई- आणि आई अशी मंडळी आम्ही कुटुंबात होतो.''

''आणि वडील?''

''माझे वडील कलंदर आयुष्य जगले. त्यांचं बहुतेक आयुष्य भ्रमंतीतच गेलं.''

''वडील काय करायचे?''

''ते काय करत नव्हते? तसे फारसे शिकलेले नव्हते. मॅट्रिकसुद्धा झाले नव्हते. त्यांचं शिक्षण जरी फारसं झालं नव्हतं तरी त्यांना पुस्तकांबद्दल प्रेम होतं. ते पुस्तकं विकायचे. सामाजिक आणि राजकीय कार्य त्यांनी खूप केलं. १९३७ पर्यंत महात्माजींच्या चळवळीत ते होते. १९३७ साली स्वातंत्र्यवीर सावरकर सुटल्यानंतर ते हिंदू महासभेचे काम करू लागले आणि गोरक्षणाच्या कार्याच्या निमित्तानं खूप फिरले. पुढे पुढे तर त्यांना 'गोरक्षक फडके' म्हणूनच ओळखायचे.''

''असं अस्थिर आयुष्य जगणाऱ्या कुटुंबप्रमुखाची आर्थिक परिस्थिती बहुतेक चांगली नसतेच-''

''आमचीही नव्हती. बालपण आर्थिक ओढघस्तीतच गेलं.''

''तुम्ही फडके मंडळी म्हणजे शिक्षणाच्या क्षेत्राला वाहून घेतलेली. भादिंनी आणि तुम्ही महाराष्ट्रात नाव मिळवलंत. मग घरच्या अशा वातावरणात तुम्ही शिकलात कसे?''



''माझी आजी बालविधवा होती तरी अतिशय प्रोगेसिव्ह विचारांची. तिचं माहेर जमखिंडीचं. तिथं शिक्षणाचं वातावरण होतं. ती स्वत: निरक्षर होती तरी शिक्षणाचं महत्त्व जाणत होती. मुलांनी शिकलं पाहिजे हा तिचा आग्रह. वडिलांची ही भ्रमंती बघून माहेरच्या जवळचं गाव म्हणून तिनं सोलापूर स्थायिक होण्यासाठी निवडलं. आमचे सगळेच आप्त जवळ कर्नाटकात होते. त्यामुळं आम्ही तिच्याबरोबर तिच्या माहेरी जमखिंडीला जायचो. माझ्या आजोळचा माझ्यावर फार परिणाम झाला.

माझ्या आईचे वडील अनंतराव जोशी यांना साहित्य, सामाजिक चळवळी यांचं फार प्रेम होतं. त्यामुळंच मला वाटतं त्यांनी आपली मुलगी फडक्यांच्या घरात दिली.

माझ्या वडिलांना पुढं अध्यात्माचंही वेड लागलं. उमदीकर महाराजांकडून त्यांनी दीक्षा घेतली होती. निंबाळच्या आश्रमात त्यांना त्यांचे गुरुबंधू (रानडे) भेटायचे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही माझ्या वडिलांच्यावर फार मोठा परिणाम झालेला होता.''

''एक प्रश्न विचारते हं! घरात जे काही घडत असतं त्याचा परिणाम कळत नकळत मुलांच्यावर होत असतो. तुमच्या वडिलांच्या धार्मिकतेचा तुमच्यावर कसा काय परिणाम झाला नाही?''

''त्याला कारण माझी आजी. ती फार लिबरल होती. त्याकाळी व्रतवैकल्यांचं इतकं स्तोम असतानासुद्धा तिनं माझ्यावर कसली सक्ती केली नाही. इतर जातीचे, धर्माचे माझे मित्र घरी यायचे ते ती चालवून घेई. तिचा स्वभाव अतिशय स्वाभिमानी आणि सेन्सिटिव्ह होता. गरिबाविषयी कुणी उल्लेख केला की तिला फार लागे. मुलांनी शिकलं पाहिजे हा तिचा हट्ट होता. त्यामुळं माझं ठाम मत झालं, जगात ईश्वर वगैरे असं काही नाहीच. तसं असतं तर या चांगल्या माणसांना हे सगळं का सहन करावं लागलं असतं? आमच्या घरात फक्त माझीच मतं अशी होती.''

(य.दिं.ना अतिशय खालच्या आवाजात बोलायची सवय आहे. बोलताना त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हसू असतं. मध्येच कधी गंभीर झाले किंवा आवेशानं बोलायला लागले की, त्यांच्या आवाजातले चढ-उतार जाणवतात. पण हेही जाणवतं की, ते आपला आवाज एका ठराविक पट्टीच्या वर जाऊ देत नाहीत. नापसंतीची किंवा रागाची एक उभी आठी कपाळावर उमटून जाते. हे पाहिलं की वाटतं या माणसानं संबंध आयुष्यालाच एक शिस्त लावून घेतली आहे. संयमानं त्याला घाट दिला आहे.)

''म्हणजे तुमचं सगळं शिक्षण आजीच्याच देखरेखीखाली झालं का?''

''तसं नाही. अगदी बालवयातले संस्कार आजीचे होते. १९४४ मध्ये माझ्या वडिलांना पॅरालिसिस झाला. त्यावेळी आधार द्यायला कोणीही फिरकलं नाही. या गोष्टीचा आमच्या बालमनावर फार परिणाम झाला. माझ्या मोठ्या बंधूंनी - (भा.दि.) मॅट्रिकनंतर घर सांभाळलं. त्यांना खूपच सहन करावं लागलं.''

''शिक्षण सोलापूरलाच झालं का?''

''हो. त्या शिक्षणाची एक गंमत सांगतो. वयाच्या सहाव्या वर्षी मी शाळेत जायला लागलो, पण मला शाळेत जायला मुळीच आवडायचं नाही.' (यावर मी मोठ्यानं हसलेच, पण तेही हसले.)

'वडील शाळेत पोचवून आले की, त्यांच्या आधीच मी घरी पोचलेला असायचा. त्यामुळं मी खूप मार खाल्लाय. राधाबाई म्हणून आमच्याकडं एक मोलकरीण होती. तिनं, मी शाळेत जात नाही हे बघितल्यावर मला उचललं आणि हौदात बुडवलं. मग मात्र हौदात बुडण्याच्या भीतीनं मी नियमानं शाळेत जायला लागलो. जायला लागल्यावर मात्र रमलो. शाळेत खेळाचंही आकर्षण निर्माण झालं.''

''कुठचा खेळ?''

''क्रिकेट. दुसरी-तिसरीत असताना मॅच बघून मी स्कोअर सांगायचा. बॉबी ल्यारखानची मी नक्कल करीत असे. खेळण्यापेक्षा कॉमेंटरी करणं आणि त्यावर वाचणं हेच अधिक होतं.

पुढे मी हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये शिकायला लागलो. शाळेत असल्यापासून मला वाचनाची आवड लागली. नवव्या-दहाव्या वर्षी मी वृत्तपत्रं, साप्ताहिकं, पुस्तकं वाचीत असे. शिवाय भावाचं, मित्रांचं सर्कल मोठं होतं. ते हस्तलिखित काढायचे. त्यांचं एक शारदोपासक मंडळही होतं. त्यातून नाटकं, संगीत, वक्तृत्व या सगळ्या उलाढाली चालायच्या. श्रीराम पुजारी, नरेश कवडी, त्र्यं.वि. सरदेशमुख, माझे बंधू भा. दि. ही सर्व मंडळी मोठ्या उत्साहानं कार्य करायची. मी रात्र-रात्र त्यांच्यात बसून गप्पा ऐकायचा.

(आता प्रश्न विचारायलाच नको होते. यदि थेट सोलापुरात जाऊन पोचले होते. उलाढाली करणारा चळवळ्यांचा तो ग्रुप आणि त्यातला छोटा यशवंत. माझ्यासमोरचे समीक्षक. संशोधक वगैरे वगैरे फडके केव्हाच अस्पष्ट झाले होते. हातातली वही-पेन बाजूला सारून मी पण हरिभाई देवकरण हायस्कुलात जाऊन पोचले होते.)



हरिभाई शाळेतल्या मंगळवेढेकर आणि श्रोतीय या दोन शिक्षकांमुळं मला इंग्रजी साहित्य वाचावं असं वाटू लागलं. वा. शि. आपटे म्हणून आम्हाला मराठीचे शिक्षक होते. भावे म्हणून दुसरे एक शिक्षक होते. या शिक्षकांनी माझी रानडे वक्तृत्व स्पर्धेकरिता तयारी करून घेतली. आणि मला भाग घ्यायला लावला. मी या स्पर्धेत १९४५ साली प्रथमच भाग घेतला होता.''

''या यशाचा उल्लेख करणारा एखादा अंक असेलच की.''

''हो आहे. मी शोधतो.'' बारा वर्षांच्या मुलाच्या उत्साहानं यदि उठले. कागदांची उलथापालथ झाली आणि माझ्या हातात हायस्कूलचं नियतकालिक आलं. दुसऱ्याच पानावरचा पहिला फोटो, य.दि.फडके.

रानडे वक्तृत्त्व स्पर्धा, पुणे (१९४५). माझ्यासमोरच्या नियतकालिकात एक तेरा-चौदा वर्षांचा (चक्क कोट घातलेला) मुलगा होता. हातात अर्थातच पुस्तकं. चेहऱ्यावर कमालीचा आत्मविश्वास आणि डोळ्यांत अशी तडफ की, पाहणाऱ्याला सहज कळावं, ''होय, मला हे पटतं आणि जे मला पटतं ते मी बोलणार.'' असंच ते डोळे सांगतायत.

''१९४७ मध्ये मी कॉलेजला जायला लागलो. माझ्याजवळ फी भरायलाही पैसे नव्हते. स्कॉलरशिप् किंवा फ्रीशिप् मागाहून मिळते. आधी पैसे भरावे लागतात. त्यावेळी डॉ. परचुरेबाईंनी माझ्या फीचे पैसे दिले नसते तर मी शिकू शकलो नसतो. त्यांना माझं फार कौतुक होतं. मी बी.ए; एम्.ए. झालो त्यावेळी सगळ्यात आधी त्यांना पेढे घेऊन गेलो.

आर्थिक ओढाताण होती तरी माझं कॉलेजचं आयुष्य फार चांगलं गेलं. माझ्या सगळ्याच प्राध्यापकांनी मला खूप दिलं. आमचे संबंध कॉलेजपुरते असे व्यवहारी कधीच राहिले नाहीत.''

''कविवर्य बेंद्र्यांविषयी तर आपण अतिशय कृतज्ञतेनं लिहिलंय.''

''त्यांच्याबद्दल तर काय सांगू? त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना किती तऱ्हेनं आणि किती ज्ञान दिलं हे सांगायला शद्बच नाहीत. त्यांचा फार मोठा ठसा माझ्या मनावर उमटला होता-''

यदि बोलता बोलता किंचित् थांबले, आता त्यांना कुठलाही प्रश्न विचारला असता तर बोलण्याचा सगळा ओघच बदलला असता. मला ते होऊ द्यायचं नव्हतं. म्हणून अबोलपणी मी वहीवर काहीतरी लिहित राहिले. बोलायला लागले की, यदि

आपल्यातच मग्न होतात हे माझ्या लक्षात आलं होतं. आता नेमकं तेच झालं. कविवर्य बेंद्र्यांच्या आठवणींशी ते आले होते. तिथूनच त्यांनी बोलायला सुरुवात केली.

''बेंद्र्यांना मी अण्णा म्हणायचो. अण्णांच्या एकूणच सहवासाचा माझ्या जीवनावर फार मोठा परिणाम झाला. माझी साहित्याविषयीची समज त्यांच्याशी बोलण्यामुळं विस्तृत झाली. त्यांची स्वत:ची फार मोठी लायब्ररी होती. त्यातूनच मला चांगली पुस्तकं वाचायला मिळाली. अण्णा सोलापूरच्या कॉलेजात कानडीचे प्राध्यापक होते. आम्ही काही मित्र कॉलेजला जाताना मुद्दाम त्यांच्या घरावरून जायचो. मग ते चालत आमच्याबरोबर येत. रोज असं चालत जाताना त्यांच्याकडून खूप ऐकायला मिळे.

मास्ती व्यंकटेश अय्यंगारांच्या 'सुब्बण्णा' या कादंबरीचं त्यांनी माझ्याकडून मराठीत भाषांतर करून घेतलं होतं. त्या भाषांतरामुळं खुद्द मास्तींच्या तोंडून त्यांच्या कृतीचं मर्म मला समजून घेता आलं. ज्याँ पॉल सार्त्र यांच्या 'वॉल' या कथेचा अनुवाद त्यांनी माझ्याकडून करवून घेतला होता. सार्त्रचा निरीश्वरवादी अस्तित्त्ववाद अण्णांना मान्य नसतानाही सार्त्रच्या साहित्यातले बारकावे, त्याची तात्विक भूमिका अण्णांनी मला समजून सांगितली होती. क्लासिक्स वाचण्यावर त्यांचा भर होता. त्यांनी कितीतरी भाषांतरंही माझ्याकडून करवून घेतली होती.....

अण्णांच्या निकट सहवासामुळं माझं आधीचं लेखन किती नकली आहे हे मला कळलं. शद्बांचं सामर्थ्य काय असतं हे अण्णांच्यामुळंच मला कळलं. कुणाचं तरी अनुकरण करण्यापेक्षा स्वत:ला लिहावंस वाटलं तरच लिहावं असं अण्णा म्हणत. मला वाटतं, संशोधनाकडे मी वळलो त्याचं मूळ अण्णांच्या या संस्कारात आहे.''

(कविवर्य बेंद्रे म्हणजे यदिंचं मर्मस्थान. त्यांच्याविषयी बोलताना यदि अगदी भारावून गेले. बालपणाच्या आठवणी सांगता सांगताच ते एकदम 'बेंद्रे' या दीपस्तंभाशी थांबले. त्यांच्या सगळ्या संभाषणालाच एक कवितेची लय आली. त्यातूनच महाकवींचं सुंदर व्यक्तिदर्शन मला घडलं.)

पाणी पिण्याच्या निमित्तानं एखादं मिनिट मी तसंच जाऊ दिलं आणि मग विचारलं, ''मुंबईला आल्यावर या सगळ्या लोकांशी तुमचा संपर्क एकदम तुटला असेल नाही?''

''नाही. माझ्या सगळ्या प्राध्यापकांशी माझे चांगले संबंध राहिले. प्रा. जी. एन. शर्मा यांच्याशी माझा अजूनही संपर्क आहे. अण्णा तर इकडे येऊन गेलेले आहेत.''

''बी.ए. आणि एम्.ए. ला तुमचं पॉलिटिक्सच होतं?''



''बी.ए. ला इकॉनॉमिक्स होतं. बी.ए. झाल्यावर मला फेलोशिप मिळाली. कॉलेजमध्ये मी पहिला आलो. मोठ्या भावाची इच्छा होती की, मी आय्.ए.एस्. व्हावं किंवा धनंजयराव गाडगीळांच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत शिकावं. पण त्याच्यावर सगळ्या घराचा बोजा होता. १९४१ ते ४७ या सहा वर्षांत मोठ्या भावानं एकट्यानंच घराची जबाबदारी उचलली होती. मी कॉलेजात जायला लागल्याबरोबर नोकरी धरली, शिकवण्या करायला लागलो आणि जबाबदारी उचलण्यात हातभार लावू लागलो.

बी.ए. झाल्यावर मला पुण्याला नोकरी मिळाली होती, पण तिथं राहिलो असतो तर घरी पैसे पाठवता आले नसते. पुन्हा भावावर सगळा भार पडला असता. मला ते मान्य नव्हतं. म्हणून मी सोलापूरला परत आलो. प्राध्यापक व्हायचं ही तर माझ्या मनात ठरलेली गोष्ट होती. १९५३ मध्ये मी पॉलिटिक्स घेऊन एम्.ए. केलं पण कॉलेजमध्ये नोकरी मात्र १९५४ मध्ये धरली आणि त्यानंतर इकॉनॉमिक्स घेऊन बाहेरून पुन्हा एम्.ए. केलं.''

''तुम्ही लेक्चरर झालात हे तुमच्या आजींनी ऐकलं?''

''आजीला माझी अपॉइंटमेंट झाली हे ऐकायला मिळालं. ती नेहमी मला म्हणायची, 'तू खूप शिक. मी तुला करून घालायला येईन.' नातवानं लेक्चरर व्हावं, सुना शिकलेल्या मिळाव्यात ही तिची फार इच्छा होती. ती पूर्ण झाली.''

''केलेल्या सर्व धडपडीचं चीज झालं असं तुम्हाला वाटलं असेल. या आठवणीतला आनंद, समाधान तुमच्या मनात कायम कोरलं गेलं असेल. काही आठवणी अशाच असतात. आणखी एखादी आठवण सांगाल? मला ठाऊक आहे, मुलाखतीत हा प्रश्न नेहमीच विचारला जातो. तरी तो आवश्यक आहे.''

''सांगतो ना-'' यदि एक मिनिट विचारात पडले. निश्चित कुठल्या संदर्भातलं काय सांगावं याच विचारात ते असावेत. मी म्हटलं, ''आयुष्यातला एखादा गंभीर प्रसंग, घरच्यांसंबंधी काही किंवा जवळच्या माणसाबद्दल-''

''मी तुम्हाला बोललो की आम्ही चौघं भाऊ आणि एक बहीण- तिला लहान वयातच पोलिओ झाला. पुढे तो बरा झाला, पण तिचं शिक्षण काही फारसं होऊ शकलं नाही. चौथीपर्यंतच शिकली.''

''बहीण मोठी की धाकटी?''

''धाकटी. पुढं नटसम्राट गणपतराव जोशींच्या नातवाबरोबर तिचं लग्न झालं. पण तिचा संसारही नीट झाला नाही. एक दिवस घरात अनफॉर्च्युनेटली आम्ही कुणी नव्हतो. फक्त आईच होती आणि अशा वेळी बहीण स्टोव्हवर भाजली. तसं तिच्या आयुष्यात काही चांगलं घडू शकलं नाही–'' आठवणींशी यदि क्षणभर थांबले. मी उगाचच इतकं घरगुती विचारलं असं मला झालं. विषय बदलत मी म्हटलं, ''तुमच्या लेखनाची सुरुवात तशी शाळेच्या वयापासूनच झाली नाही का?''

''हो. कॉलेजच्या वयात लेखनाचे जे काही थोडेबहुत पैसे मिळायचे त्याचं महत्त्व होतं. गरजही होती. विशेष म्हणजे प्रकाशकांकडून पत्रं यायची. मी लिहायचे. पण अण्णांच्या सहवासामुळं माझी साहित्याविषयीची समज विस्तृत झाली. लेखनाच्या एकूणच पद्धतीत आपोआप फरक होत गेला.''

''मग तुमच्या कॉलेजच्या वयातला जो ग्रुप होता तो तुटला असेल–''

''मुंबईला आल्यावरही आमचा एक चांगला ग्रुप फॉर्म झाला होता. मी, उत्तरवार, दा. गो. देशपांडे ('सिनिक') ना. व्यं. देशपांडे, नाफडे, यशवंत कानिटकर, कविवर्य वा. रा. कान्त व माधव सराफ असा आमचा एक चांगला ग्रुप झाला. त्या ग्रुपला दलालांनी 'अजून' हे नाव दिलं. त्यांनी 'दीपावली'चा ऑगस्ट १९६६ चा 'अजून' अंकदेखील काढला. तो अंक फार चांगला निघाला होता.''

'' 'अजून'चं स्वरूप काय होतं?''

''स्वरूप म्हणजे– आम्ही मित्र एकत्र जमायचो. काही लिहिलं असेल तर ते वाचायचं, त्याच्यावर चर्चा करायची, आपली मतं मांडायची असं चालायचं आणि यातली बरीचशी मंडळी पुढं चांगली नावारूपाला आली हे तुम्हाला ठाऊकच आहे.''

''मला वाटतं आजच्या गप्पा आपण इथंच थांबवूया. आज मी विशेष नोट्स न घेता फक्त ऐकत होते.''

''तुम्हाला नक्की काय हवंय ते सांगा. म्हणजे त्याबद्दल मी बोलेन.''

त्यांच्या आवाजातला बदल मला जाणवला. ''म्हणजे आजचं हे सगळं वाऱ्यावरच का?'' असा तो सूर होता. मी खाली मान घातली आणि स्वत:शीच हसले. त्यांना मी कसं सांगू, की य.दि. फडके नावाचा हा पंडित माझ्याशी धड बोलणार आहे की नाही याचाच मला अंदाज घ्यायचा होता. माणूस समजल्याशिवाय नुसती पुस्तकी मुलाखत मला कधीच घेता येत नाही. त्यामुळं 'फडके सर', 'फडके



लेखक' आणि 'य.दि.– एक माणूस' या तीनही दृष्टिकोनांतून त्यांना समजून घेणं हा आजच्या गप्पांचा उद्देश होता. त्यामुळं पुढचं काम बरंच सोपं झालं होतं.

उठत असता मी विचारलं, ''तुमची पत्रं मला वाचायला मिळतील? कारण पुस्तकांपेक्षासुद्धा पत्रातून माणूस अधिक समजतो असं मला वाटतं. वेगळे वेगळे मूड्स लक्षात येतात. इतरांची तुमच्याविषयीची मतं कळतात.''

''पत्रं काढून ठेवतो. तुम्हाला त्यातली कुठली हवीत ती पाहा.''

घरी जाताना माझ्या मनावरचं दडपण बरंचसं कमी झालं होतं.

पत्रांच्या ढिगाऱ्यातून मुळी डोकं वर निघतच नव्हतं. सगळीच महत्त्वाची अन वाचायलाच हवीत अशी.

**मित्रांची, मान्यवरांची, गुरूंची, यदिंचा गौरव करणारी, साहित्यिकांना– संशोधकांना महत्त्वाची वाटावीत अशी अन् काही अगदी घरची. या सर्वांतून यदिंचं एक अस्सल चित्र रेखाटता यावं. नाक, कान, डोळे यापलीकडेही माणूस असतो. न पाहताही समजणारा. 'अशा' शद्बांतून तो शोधायचा असतो– सापडतो.**

(लेखक, प्रकाशक, मानधन या सगळ्याची कल्पना देणारं हे पत्र–)

२८–४–८८

कूटकथा कार्यालय,

७८२, सदाशिव पेठ, पुणे–२.

आपण समक्ष आणून दिलेले '२० लाखांचे जवाहिर' नावाच्या कादंबरीचे हस्तलिखित आज वाचून पाहिले. छापण्यास हरकत नाही. परंतु सांप्रतच्या परिस्थितीत आपणास मोबदला म्हणून विशेष रक्कम देता येणे आम्हास अशक्य आहे. तरी उत्तेजनार्थ उपहार म्हणून आपणास रु. १० देण्यात येतील व आपल्या पुस्तकाच्या १० प्रती आपणांस घरपोच मिळतील. सदरहू रु.१० पुस्तक छापल्यानंतर ताबडतोब मिळतील.

**सही– मॅनेजर**

✦

(हे भावेसरांचं पत्र. शिक्षकांशी असलेलं नातं यातून स्पष्ट होतं)

रुग्णोपयोगी वस्तुसंग्रह, सोलापूर-१

२९-१२-७३

प्रा. डॉ. यशवंत दिनकर फडके.

सद्य:कालीन राजकारणासारखा खळबळीचा विषय घेऊन त्यावर प्रबंध लिहिणे हे एक प्रकारे मला तारेवरची सर्कस वाटते. त्यात आपण यशस्वी झाला. हे विशेष!

इ. १० वीतील वक्तृत्वाच्या चढाओढीत भाग घेऊन शाळेस कीर्ती मिळवून देणारा छोटा यशवंत आणि आज 'डॉक्टर' या पदवीने विभूषित झालेला यशवंत, यामधील आलेख मोठा स्पृहणीय वाटेल.

सही- (द. प्र. भावे)

✦

कॅन्सर रिसर्च सेंटर,
मधुरा भुवन, अलिबाग.
१६-१२-६८

आपण फार महत्त्वाचे काम करीत आहात. माझा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नाशी निकटचा संबंध असल्यामुळे त्यावर मी काही लिहावे असे अनेकांनी सुचविले होते. परंतु खरोखर म्हणजे आळसामुळे झाले नाही. आता तुम्ही ते करीत आहात तेव्हा तुम्हास त्याबाबत सर्व मदत करावी. डोक्यात खूप त्यासंबंधी भरलेले आहे. आपणही अनेकांना भेटून माहिती मिळविली आहेच. टिप्पणे केली आहेत. ती मला पाहावयास मिळाल्यास त्या संदर्भात मी आपणाशी प्रदीर्घ चर्चा करू शकेन. कारण या प्रश्नात सर्वांचा कस लागलेला आहे. अनेकांच्या भूमिकांत धरसोड झालेली आहे. कोलांट्या उड्या घेतल्या आहेत. संधिसाधूपणाही आहे. तेव्हा त्या सर्वांचे एकवेळ विच्छेदन होणे जरूर आहे.

**सही- य. कृ. सोवनी**

✦

SIR PARASHURAMBHAU COLLEGE
Poona - 411 030
21st, January, 1973



It gave me great joy to know that you have got your Ph.D. your keen and incisive intellect coupled with your love for untiring industry shall always help you. I feel proud to see you rise steadily.

Sd/- K.P. Mangalvedhekar

✦

कै. बेंद्र्यांविषयींच्या ज्या आठवणी तुम्ही लिहिल्या आहेत त्यांनी माझे डोळे ओले होण्याचे काही कारण नाही; पण तुमचा लेख वाचताना तसे घडले मात्र. वारंवार... बेंद्र्यांविषयी वाटणारा जिव्हाळा.... तुमचे प्रांजळ लेखन किंवा आणखी कोणते कारण या मागे आहे कुणास ठाऊक?

सही- वसंत जोशी

✦

(एकेक पत्र नजरेखालून घालत मी, कवी शंकर वैद्यांच्या पत्राशी येऊन ठेपले.)

शंकर वि. वैद्य,
आफ्रिका हाऊस, एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई- १९.
दिनांक - २-११-७३

तुमचा 'मौज'च्या दिवाळी अंकातला डॉ. केतकरांच्या विचारविश्वाचा परिचय करून देणारा आणि समालोचन करणारा लेख आवडला. त्यांच्या सामाजिक विचारांची मांडणीच तुम्ही अशी केली आहे की, त्यांचे परीक्षण, मूल्यमापन करणारे तुमचे वैचारिक निकष, तुमची सामाजिक जीवनाकडे पाहण्याची वैचारिक भूमिका या गोष्टी आपोआपच स्पष्ट होत जातात. केतकरांच्या साहित्याच्या पसाऱ्यातून त्यांच्या वैचारिक निष्ठांचा नेमका शोध घेऊन एका कालाच्या पार्श्वभूमीवर वास्तुरूपात त्यांचे दर्शन घडवणे आणि रोखठोकपणे त्याचा परामर्श घेणे हे काम अवघड आणि जिकिरीचे होते. ते तुम्ही नेटाने पार पाडले. विचारांचा परिचय करून देताना त्या वास्तूस आधारभूत असणाऱ्या केतकरी मनाची, व्यक्तिमत्त्वाचीही ओळख त्यातून घडत जाते. तसेच केतकरांची विचारपरंपराच आजचे काही राजकीय पक्ष कशी पुढे चालवीत आहेत, हे तुम्ही न लिहिताही, आपोआप सूचित होऊन जाते. केतकरांच्या कादंबऱ्या, काव्य,